दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष २ रे || अंक २१४ || गुरूवार १८ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# दक्षिण काशी हरिहरेश्वर मंदिर आषाढी एकादशीला अखंड हरिनाम जागराने दुमदुमले

श्रीवर्धन कोलमांडाला सोपान निंबरे; भक्तीची प्रति पंढरी दक्षिण काशी श्रीक्षेत्र हरीहरेश्वर , महाराष्ट्रातील अतिशय प्राचीन तीर्थक्षेत्र या क्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त आहे. याच तीर्थक्षेत्री सोम सुत्री प्रदक्षिणा देवाला घातली जाते , कोसाची प्रदक्षिणा घातली जाते, असे हे जागृत तीर्थक्षेत्र श्रीदेव कालभैरव योगेश्वरी माता तसेच श्रीदेव हरी हरेश्वर, विष्णू तीर्थ, शुक्ल तीर्थ, गायमुख तीर्थ, मुक्ति धाम, ब्रह्मा विष्णू , महेश्वर, आणि पार्वती तसेच अगस्ती ऋषींचा वास्तव्याने वेढलेले डोंगर असे हे महान तीर्थक्षेत्र या ठिकाणी देवशयनी आषाढ शुद्ध एकादशीला पंचक्रोशीतील सर्वच समाजातील बांधवांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मंदिराच्या गाभाऱ्यात अखंड हरिनाम सेवा केली जाते.ङ्गप्रत्येक समाजाला काही विशिष्ट तास वेळ देऊन २४ तास अखंड हरिनाम जागर करण्यात येत असतो अशाने सबंध मंदिर परिसर दुमदुमून जातो. ङ्गविशेष म्हणजेच सकाळी ९ ते १२ या वेळेत भेंडखोल भंडारी समाज यांच्या सेवेमध्ये समाज बांधवाने अखंड हरिनाम जागराच्या सेवेत टाळ मृदुंगाच्या नादात, अभंग, गवळणी , गजरा मध्ये ठेका धरत आपले जीवन धन्य आणि कृतार्थ केले. टाळ मृदुंगाच्या ठेक्या वरती नाचण्याचा आनंदच याची प्रचिती याची देही याची डोळा हा अनुभव भेंडखोल भंडारी समाज बांधव व भक्तगणांनी कृतज्ञता पूर्वक लुटला. ङ्गकशाला जाता दूर हरी हरेश्वर हेचि पंढरपूर या संत वचनाप्रमाणे ज्या पांडुरंग भक्तांना आपली पंढरीची वारी पूर्ण करता आली नाही. असे संप्रदायातील भक्तगण पायी वारी ने हरिहरेश्वर तीर्थ क्षेत्री देवाला भेट देत असतात. देवा प्रती असलेले आपली कृतज्ञता भाव, समर्पण भाव व्यक्त करीत ङ्गश्रीदेव हरी हरेश्वर मध्ये आपला पांडुरंग पाहत आपली वारी पूर्ण करतात अशी परंपरा आहे. कारण पंढरपूर पेक्षा एक तोळा तीर्थ चे अधिक महत्त्व हरिहरेश्वर या तीर्थक्षेत्राला असल्याकारणाने देशातून आणि राज्यभरातून असंख्य भक्तगण पर्यटक भेट देत असतात. ङ्गआषाढी एकादशीच्या या वारीला परिसरातील सर्वच ग्रामस्थ आपापल्या दिलेल्या वेळेत मंदिर परिसरामध्ये उपस्थित राहून अखंड २४ तास सुरू असलेल्या हरिनामजागरामध्ये आपला सहभाग नोंदवून भगवंता प्रती कृतज्ञता भाव व्यक्त करतात.ङ्गतसेच देवस्थान समिती कडून सेवा देणाऱ्या सर्व समाजांच्या अध्यक्षांचा श्रीफळ, शाळ भेट देत सन्मान करून त्यांच्या प्रती कृतज्ञता भाव व्यक्त केला जातो. ङ्गआता कोठे धावे मन, तुझे चरण देखिलिया..ङ्गभाग गेला शीन गेला, अवघा झाला आनंद...ङ्गअतिशय भक्तिमय वातावरणामध्ये हा सोहळा संपन्न झाला.



# पालीत उ. बा.ठा शिवसेनेला धक्का : पाली उ.बा. ठा शिवसेना शहर प्रमुख ओमकार खोडागळे यांचा शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश, आमदार महेंद्र दळवी यांनी केले स्वागत

पाली/बेणसे
(धम्मशील सावंत)

पाली सुधागड सह रायगड जिल्ह्यात शिवसेना पक्षसंघटनेला दिवसागणिक मजबुती मिळत आहे. अन्य पक्षातील कार्यकर्ते शिवसेनेत मोठ्या संख्येने सामील होत आहेत .पाली उ.बा. ठा शिवसेना शहर प्रमुख ओमकार खोडागळे यांनी दि.(१७) बुधवारी शिवसेना (शिंदे गटात) जाहीर प्रवेश केला. यावेळी अलिबाग मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी यांनी खोडागळे यांचे पक्षात स्वागत केले. पाली सुधागड येथील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश करीत असल्याने ग्रामीण व शहरी भागात पक्षाला अधिक उभारी मिळत आहे, शिवाय आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका , विधानसभा निवडणुकांत देखील शिवसेनेला याचा मोठा फायदा होणार असल्याचे शिवसेना युवा जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे यांनी सांगितले. याप्रसंगी आमदार महेंद्र दळवी म्हणाले की महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली, आणी त्यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून रायगड आणी सबंध महाराष्ट्रात शिवसेनेत जोरदार इन्कमिंग सुरु आहे. पेण सुधागड रोहा मतदारसंघ असो की अलिबाग मुरुड मतदार संघ येथील विविध पक्षातील नेते, कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करीत आहेत. पाली येथील शहर प्रमुख ओमकार खोडागळे यांच्यासारखे दांडगा जनसंपर्क असलेले कार्यकर्ते आमच्या पक्षात येत आहेत. ही समाधानाची बाब असून विकास कामांच्या स्वरूपात आम्ही जन माणसात पोहचलो याचा निश्चित आनंद आहे.

असे आमदार दळवी म्हणाले. ओमकार खोडागळे यावेळी म्हणाले की शिवसेना पक्ष वाढीसाठी मी जोमाने काम करणार असून जास्तीत जास्त तरुणांना पक्षात आणण्याचा माझा प्रयत्न राहील.

शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाशभाऊ देसाई, उपजिल्हा प्रमुख अनुपम कुलकर्णी, सुधागड तालुका प्रमुख रवींद्र देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तसेच आमदार महेंद्र दळवी व शिवसेना युवा रायगड जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदरचा पक्ष प्रवेश करण्यात आला. याप्रसंगीङ्गङ्ग शिवसेना युवा रायगड जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे, संपर्क प्रमुख संदीप दपके, नगरसेवक सचिन जवके, युवा तालुका प्रमुख मनोज भोईर, संजय ओसवाल, मिलिंद देशमुख आदीसह शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.



# कोलमांडाले जि प मराठी शाळेमध्ये आषाढी एकादशी कार्यक्रम उत्साहात संपन्न

श्रीवर्धन कोलमांडाला सोपान निंबरे; दि. १७ जुलै २०२४ रोजी आषाढी एकादशी निमित्ताने रा जि प शाळा कोलमांडले मराठी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन




करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त नाटिका सादर केली. तसेच नृत्य सादरीकरण केले. यानिमित्ताने विठुरायाची मुर्ती, तुळशी वृंदावन, पालखी घेऊन मुलांनी गावात दिंडी काढली.

गावातील ग्रामस्थांनी मुलांच्या दिंडीमध्ये सहभाग घेत त्यांनीही विठुरायाची आराधना केली. विद्यार्थ्यांनी नाचून व फुगडी घालून, विठुरायाचे अभंग गात आनंद व्यक्त करत दिंडीत तल्लीन झाले.

शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक वर्ग व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या सहकार्याने आषाढी एकादशीचा कार्यक्रम उत्साहात व आनंदात पार पडला.

# संतोष भाई मेहता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विठ्ठल नामघोषात चिमुकल्यांची वारी...!

दापोली:-संतोषभाई मेहता इंग्लिश मिडियम स्कूल दापोली या प्रशालेत आनंदवारी हा कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडला.भक्तिमय उत्साही वातावरण या आनंदवारी कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेत तयार झाले होते.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे शाळेचे सेक्रेटरी सुजय मेहता उपस्थित होते. या आंनदवारी मध्ये



प्री प्रायमरी व इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थिनी दिंडी , संत परंपरेवर आधारित ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली ही लघु नाटिका सादर केली. इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी तसेच विविध संताच्या वेशभूषा अशा विविध कार्यक्रमात सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. तसेच विद्यार्थ्यानी संतांवर आधारीत अभंग,ओव्या, प्रवचन, किर्तन, सादर केले. त्याचप्रमाणे शैलेश शिंदे सर यांनी अभंग सादर केला. महाराष्ट्राला लाभलेली काही शेकडो वर्षांची संत परंपरा यांनी आपल्याला केवळ आध्यात्मिक वारसा दिलेला नाही तर सामाजिक वारसाही दिला आहे अध्यात्मिक शिकवणूक की बरोबरच सामाजिक प्रबोधनही केले आहे आणि हा सामाजिक प्रबोधनाचा वारसा नवीन पिढीने म्हणजेच विद्यार्थ्यांनी पुढे न्यावा यासाठीच अशा कार्यक्रमाचे आयोजन प्रशालेत करण्यात येत आहे असे मनोगत शाळेचे चे सेक्रेटरी सुजय मेहता यांनी कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केले. वारी म्हणजे भक्ती अध्यात्म आनंदाचा सोहळा नसून सर्वांमध्ये विठ्ठल म्हणजेच सर्व समान अशी समानतेची भावना रुजवणारा सुंदर सोहळा आहे असा संदेश या कार्यक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला.संस्थेच्या अध्यक्षा सरोज मेहता यांनी संपूर्ण कायर्क्रमाला शुभेच्छा दिल्या. प्रशालेच्या मुख्याध्यापिका चंदाली पारकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्विरित्या पार पडला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# गद्दारांचे सरकार उलथावून राज्यात परिवर्तन करायचे -आदित्य ठाकरे

कर्जत जयेश जाधव

महाराष्ट्र राज्यातील घटनाबाह्य सरकार उलथवून टाकायचे आहे आणि गद्दार सरकार हरवून राज्यात परिवर्तन करायचे, असा निर्धार युवासेना प्रमुख शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे कोणालाही फसवू शकत नाही असे महाराष्ट्र राज्यातील जनतेला वाटत आहे आणि त्यामुळे राज्यातील जनता महाविकास आघाडीचे सरकार आणल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार आदित्य ठाकरे यांनी या सभेत व्यक्त केला.ङ्गङ्गकर्जत विधानसभा मतदारसंघ शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसंवाद सभेचे आयोजन केले होते. ते पुढे म्हणाले की, हे घटनाबाह्य सरकार पायउतार होत नाही, तोपर्यंत मी त्यांना कायम घटनाबाह्य म्हणणार आहे. जगातील नवव्या क्रमांकाचा मोठा पक्ष महाराष्ट्रात ९ वर येऊन ठेवला आहे. हा सर्व चमत्कार मतदार राजा करू शकतो असे सांगून महविकास आघाडीचे सरकार आणून परिवर्तन करायचे आहे.ङ्गङ्गशिवसेना उप नेते आमदार सचिन अहिर, मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनीही सभेला संबोधित केले. किरवली येथील शेळके मंगल कार्यालयात सभेला त्यावेळी शिवसेना उपनेते आमदार सचिन अहिर, उपनेत्या आणि मुंबई महापालिकेच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांच्यासह मावळ



लोकसभा मतदारसंघ संघटक संज्योग वाघेरे, जिल्हा संपर्क प्रमुख बबन पाटील, महिला आघाडी जिल्हा संघटक सुवर्णा जोशी, सहसंपर्क प्रमुख भाई शिंदे, खालापूर तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, कर्जत तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, जिल्हा सल्लागार रियाज बुबेरे आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला शिवसेना ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांनी प्रास्ताविक केले.

